नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

**दिनांक ०३/०६/२०२२ (शुक्रवार)**

**(दुपार)**

---

## जबर दुखापत

**पो.स्टे. रामटेक** :— अंतर्गत ०२ कि.मी. अंतरावरील मौजा वाहिटोला रामटेक येथे दिनांक ०१/०६/२०२२ चे १९.०० वा. ते २१.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— मनोज कृष्णाजी चौधरी, वय ४१ वर्ष, रा. वाहीटोला ता.रामटेक व त्याची पत्नी आपल्या घरासमोरील अंगणात बसले असता आरोपी क्र. १. आकाश रामेश्वर नंदनवार रा.परसोडा ता. रामटेक व

२. अनोळखी यांनी संगनमत करून क्रिम रंगाच्या स्कार्पीयो गाडीने फिर्यादीच्या अंगणात येवुन त्याच्या हातातील लोखंडी रॉड व लोखंडी सळाखीने फिर्यादीस मारण्याकरिता त्याच्या अंगावर धावला असता त्यास वाचविण्याकरिता फिर्यादीची पत्नी नामे— अल्का चौधरी ही मधात गेल्याने आरोपीने फिर्यादीच्या पत्नीच्या चेहऱ्यावर रॉडने मारले. तेवढयात गावात राहणारा श्रीराम शामु पंधराम हा झगडा सोडविण्याकरिता गेला असता आरोपीने त्यास धक्काबुक्की केल्याने तो खली पडला व त्याच्या डोक्याला मार लागला. आरोपीने फिर्यादीच्या पत्नीच्या गालावर लोखंडी रॉडने मारल्याने ती जखमी होवुन तीचे रक्त निघाले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम ३२६, ३४ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास मसपोनि भुते मो.नं. ९८२२५६६१८० या करीत आहे.

## फसवणुक

**पो.स्टे. खापरखेडा** :— अंतर्गत दहेगाव रंगारी येथे दिनांक २६.०४.२२ चे ०९.३० ते ११.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— सरोज प्रेमचद्र सक्सेना वय ४४ वर्ष, रा. प्लॉट नं. बी ११ न्यु पांजरा कोराडी खापरखेडा येथे पॅथालॉजी लॅब असुन यातील आरोपी नामे— पंकज कुमार रा. प्रताप नगर, नागपुर याने फियादीस 'मला माझ्या परीवाराची पॅथालॉजी टेस्ट करायाची आहे, पॅथालॉजी टेस्टसाठी लागणारी रक्कम मी आता गुगल पे नी पेड करतो' असे म्हणुन आरोपीने पहीले फियादीस एक रूपये पाठवीले व नंतर एक रीकवेस्ट आरोपीने फियादीच्या गुगल पे अकाउंट वर पाठवुन ही रीकवेस्ट ॲक्सेप्ट करण्यास सांगीतली. फीयादीने ती रीकवेस्ट ॲक्सेप्ट केल्याने त्याच्या अकाउंट मधुन पहीले १५,०००/—रूपये व काही वेळाने ४,०००/—रू. असे एकुण कि. १९,०००/—रूपये ची फियादीची फसवणुक केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ४२० भादंवि. सहकलम ६६ ड माहिती तंत्रज्ञान कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक श्री यादव मों.नं. ९८२३९१८४८६ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर